ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# भारतातील सेवा क्षेत्राच्या निर्यातीचा अभ्यास

**डॉ. रामदास गादगे[1], डॉ. लता दिगंबर धेंडे[2]**

[1]सहयोगी प्राध्यापक, सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे

[2]सहायक प्राध्यापक, सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे

*Corresponding Author:* डॉ. रामदास गादगे

DOI - 10.5281/zenodo.14875079

**गोषवारा:**

*कोणत्याही अर्थव्यवस्थेचा विकास होत असताना ती अर्थव्यवस्था शेती क्षेत्रातून औद्योगिक क्षेत्राकडे आणि औद्योगिक क्षेत्राकडून सेवा क्षेत्राकडे संक्रमण करते. मात्र भारताने औद्योगिक विकासाचा टप्पा पूर्ण न करता थेट सेवाक्षेत्रात संक्रमण केले. या क्षेत्राचा अर्थव्यवस्थेच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात ५५ टक्के, रोजगारात २८.९ टक्के, एकूण परकीय गुंतवणुकीच्या दोन तृतीयांश प्रवाह व एकूण निर्यातीच्या सुमारे ४० टक्के वाटा आहे. भारतात २०१८ मध्ये सेवांची निर्यात स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी आणि सेवा क्षेत्रात रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी '१२ चॅम्पियन सेवा क्षेत्रे' वर्गीकृत केली गेली. सदर अभ्यास भारतातील प्रबळ सेवा क्षेत्राचा भारतातील एकूण सेवा निर्यात व सेवा आयातीपासून मिळणाऱ्या मुल्याचा, उपक्षेत्रानुसार भारतातील सेवा व्यापाराचा व सेवा निर्यात वाढवण्यासाठीचे सरकारी उपक्रम व योजनाचा अभ्यास आहे. या अभ्यासाचे निष्कर्ष म्हणजे भारताची एकूण सेवा क्षेत्राची निर्यात २०१७-१८ ते २०२२-२३ मध्ये वाढली. मात्र आयात मूल्य कमी झाले. भारताच्या सेवा क्षेत्राच्या एकूण निर्यातीचे मूल्य हे आयातीपेक्षा नेहमीच जास्त राहिले आहे व भारताच्या सेवा व्यापारात या काळात अधिक्य दिसून येते. भारतातील एकूण सेवा निर्यातीचा वाटा सध्या जवळजवळ ४० टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. निर्यातीतील वृद्धीदर या काळात कायम राहिला. तसेच सोफ्टवेअर क्षेत्र सर्वाधिक निर्यात करणारे क्षेत्र आहे व त्याखालोखाल व्यावसायिक सेवांचा क्रमांक लागतो. २०२३ मध्ये एकूण सेवा निर्यातीपैकी सर्वाधिक म्हणजे ४९ टक्के वाटा सॉफ्टवेअर सेवाचा होता. व्यवसाय सेवा, वाहतूक सेवा, प्रवास सेवा आणि वित्तीय सेवांचा वाटा अनुक्रमे २३ टक्के, ११ टक्के, ४ टक्के आणि २ टक्के होता. भारताची सेवा आयात किंचित वाढली असली तरी वाढत्या व्यावसायिक सेवाची आयात देयके प्रामुख्याने व्यावसायिक व्यवस्थापन, सल्लागार सेवा, तांत्रिक आणि व्यापार संबंधित सेवामुळे या काळात वाढली होती. वर्ष २०२२-२३ मध्ये यूएसए, युरोप आणि यूके हे भारतातील सर्वात जास्त सॉफ्टवेअर सेवा आणि आय. टी. सेवा आयात करणारे देश आहेत. जुलै २०२४ मध्ये नेदरलँड, यूएसए, टांझानिया, सिंगापूर व मेक्सिको ही भारताच्या सेवांसाठी पाच निर्यात स्थाने होती. भारत हा जगातील सातवा सर्वात मोठा सेवा निर्यातदार देश आहे आणि जागतिक सेवा निर्यात बाजारपेठेतील त्याचा वाटा १९९३ मध्ये ०.५ टक्केवरून २०२२ मध्ये ४.३ टक्केपर्यंत वाढला आहे. सर्विस एक्सपोर्ट फ्रॉम इंडिया स्कीम (SEIS), सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क (STP) योजना, डिजिटल इंडिया इंटर्नशिप योजना, पीएचडी योजना या सेवा क्षेत्राची निर्यात वाढवणाऱ्या योजना आहेत. सेवा निर्यात प्रोत्साहन परिषद (SEPC) व इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय या दोन संस्था सेवानिर्यात वाढवण्याच्या दृष्टीने निर्यातदारांना सुविधा पुरवणाऱ्या संस्था आहेत.*

***मुख्य शब्द: सेवा क्षेत्र, निर्यात, सॉफ्टवेअर क्षेत्र, सेवा निर्यात प्रोत्साहन परिषद, सर्विस एक्सपोर्ट फ्रॉम इंडिया स्कीम.***

**प्रस्तावना:**

अर्थशास्त्रातील तीन आर्थिक क्षेत्रांची संकल्पना १७ व्या शतकातील ब्रिटनमधील विल्यम पेटीच्या अग्रगण्य लिखाणातील संकल्पना आहे. ही संकल्पना ॲडम स्मिथ, डेव्हिड रिकार्डो, कार्ल मार्क्स आणि जेम्स मिल यांच्या सुरुवातीच्या राजकीय अर्थव्यवस्थेवरील विचारांमध्ये सापडते. केनेसी ज्याला अर्थशास्त्राचा 'क्षेत्रीय- संरचनात्मक' दृष्टीकोन म्हणतो त्यातील संकल्पना म्हणजे आर्थिक क्षेत्रांची संकल्पना होय. या संकल्पनेचा अर्थशास्त्रातील त्रिक्षेत्रीय प्रतिमान म्हणून ॲलन फिशर, कॉलिन क्लार्क आणि जीन फोरस्टी यांनी विकास केला. त्यांच्यामते, अर्थव्यवस्था विकसित होताना शेती क्षेत्रातून औद्योगिक आणि शेवटी सेवा क्षेत्राकडे संक्रमित होते. या तीन टप्प्यातून संक्रमण करताना शेवटी सेवाक्षेत्र हे अर्थव्यवस्थेचे सर्वाधिक योगदान देणारे क्षेत्र ठरते. अमेरिका, ब्रिटन, जपान किंवा चीनसारख्या अर्थव्यवस्था या तीन टप्प्यातून जाऊन विकसित झाल्या आणि काही अर्थव्यवस्था विकसित होत आहेत. मात्र भारत या सर्वाला अपवाद ठरला कारण, औद्योगिक विकासाचा टप्पा सोडून भारताने शेतीक्षेत्रातून सेवा क्षेत्राकडे थेटपणे संक्रमण केले आणि सध्या सेवा आधारित विकासाच्या टप्प्यातून ती जात आहे. १९८० च्या दशकाच्या मध्यात सेवा क्षेत्राचा विस्तार होऊ लागला, परंतु १९९० च्या दशकात जेव्हा भारताने व्यवहारतोलातील तुटीची गंभीर समस्या अनुभवली तेव्हा भारतात नवीन आर्थिक सुधारणांची मालिका सुरू झाली. त्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे महत्त्व कायम वाढते राहिले. या क्षेत्राचा अर्थव्यवस्थेच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात ५५ टक्के वाटा आहे व रोजगारात २८.९ टक्के वाटा आहे. भारतात एकूण परकीय गुंतवणुकीच्या दोन तृतीयांश प्रवाह व एकूण निर्यातीच्या सुमारे ४० टक्के निर्यात या क्षेत्राची आहे. ३३ पैकी १५ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये एकूण राज्य उत्पन्नामध्ये सेवा क्षेत्राचा हिस्सा आता ५० टक्केच्या वर गेला आहे, दिल्ली आणि चंदीगडमध्ये हा वाटा ८० टक्क्यांहून अधिक आहे.

भारताच्या पंतप्रधानानी २०१८ मध्ये सेवांची निर्यात स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी आणि सेवा क्षेत्राला रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी '१२ चॅम्पियन सेवा ' वर्गीकृत केल्या. या १२ सेवा म्हणजे लेखा आणि वित्त सेवा, कायदेशीर सेवा, बांधकाम आणि संबंधित अभियांत्रिकी सेवा, पर्यावरण सेवा, माहिती तंत्रज्ञान (IT) आणि माहिती तंत्रज्ञान सक्षम सेवा (ITeS), दळणवळण सेवा, पर्यटन आणि आदरातिथ्य सेवा, शैक्षणिक सेवा, वैद्यकीयसेवा, प्रवास सेवा, वाहतूक आणि लॉजिस्टिक सेवा, वित्तीय सेवा, ऑडिओ-व्हिज्युअल सेवा आणि इतर व्यावसायिक सेवा होत. डॉलर२२७ अब्ज उत्पन्न आकारमान असाणारा आयटी उद्योग जागतिक आऊटसोर्सिंगच्या ५९ टक्के योगदान देतो व अंदाजे ५ दशलक्ष थेट रोजगार निर्माण करतो, जो भारताच्या तंत्रज्ञान क्रांतीचा पुरावा आहे. भारतात या क्षेत्राचे महत्त्व आणि प्राबल्य दिवसेंदिवस वाढत आहे. त्याबरोबरच या क्षेत्राचे निर्यातीतील योगदान दिवसेंदिवस वाढत आहे. हे क्षेत्र सेवा व्यापाराचे आधिक्य दर्शवत आहे जे व्यापार तोलातील तुट कमी करण्यासाठी उपयोगी पडते. या पार्श्वभूमीवर भारताच्या सेवा क्षेत्राची निर्यात अभ्यासाने महत्वाचे ठरते. सदर अभ्यासाची खालील उद्दिष्टे आहेत:

१) भारतातील एकूण सेवा निर्यात व सेवा आयातीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा (मुल्याचा) अभ्यास करणे.

२) वर्ष २००८-०९ ते २०२२-२३ या कालावधीतील उपक्षेत्रानुसार भारतातील सेवा व्यापाराचा अभ्यास करणे.

३) सेवा निर्यात वाढवण्यासाठीचे सरकारी उपक्रम व योजनाचा थोडक्यात आढावा घेणे.

**संशोधन पद्धती:**

सदर अभ्यासासाठी माहितीचा दुय्यम स्त्रोत वापरला आहे. भारताच्या आर्थिक सर्वेक्षण, भारताचे ट्रेड पोर्टलवरील माहिती, भारताचे वाणिज्य मंत्रालय इत्यादीचा आधार घेऊन या संशोधनातील आकडेवारीच्या आधारे निष्कर्ष काढले आहेत.

**भारतातील सेवा क्षेत्रातील आयात व निर्यात मूल्य:**

अलिकडच्या काळात, भारतातील सेवा निर्यातीत झालेली लक्षणीय वाढ ही भारतातील कोविड साथीच्या रोगानंतर सुधारलेली आर्थिक परिस्थिती आणि आर्थिक वृद्धी याचा परिणाम आहे. २००१ पासून भारताच्या सेवा निर्यातीत लक्षणीय वाढ झाली आहे, तेव्हा भारत सेवा निर्यातीत जगात २४ व्या क्रमांकावर होता. २०२३ मध्ये, भारत हा जगातील सातव्या क्रमांकाचा व्यावसायिक सेवा निर्यात करणारा देश आहे, ज्याचा वाटा सेवांमधील जागतिक व्यापारात ४.६ टक्के आहे. भारताची सेवा क्षेत्राची निर्यात राष्ट्रीय उत्पन्नात भरीव योगदान देणारी आहे. भारताच्या सेवा निर्यातीतील व आयातीतील मागील सहा वर्षांचा कल खालील तक्त्यात दर्शवला आहे. तक्त्यानुसार २०१७-१८ मध्ये ही निर्यात १,९५,०८७ दशलक्ष अमेरिकन डॉलर होती. जी वाढून २०२२-२३ मध्ये ३,२५,३३० दशलक्ष अमेरिकन डॉलर झाली.

**तक्ता क्र. १: भारताची सेवा क्षेत्राची निर्यात व आयात (२०१७-१८ ते २०२२-२३)**

**(दशलक्ष US$)**

| आयात/निर्यात | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ |
|---|---|---|---|---|---|---|
| सेवा क्षेत्राची एकूण निर्यात | १,९५,०८७ | २,०८,००० | २,१३,१९१ | २,०६,०८८ | २,५४,५१६ | ३,२५,३३० |
| सेवा क्षेत्राची एकूण आयात | १,१७,५२८ | १,२६,०६० | १,२८,२६९ | १,१७,५२२ | १,४७,०१२ | १,८२,०४५ |

**स्रोत: भारत सरकार, वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय, वाणिज्य विभाग**

भारताच्या निर्यातीत उत्पन्न किंवा मूल्याच्या आधारावर प्रथम क्रमांकावर दूरसंचार, संगणक आणि माहिती सेवा या होते. या सेवा निर्यातीतून मिळणारे मूल्य हे २०१७-१८ मध्ये ७९,८४० दशलक्ष डॉलर पासून १,५२,२८५ डॉलर इतके वाढले. दुसऱ्या क्रमांकावर व्यवसायिक सेवा असून या सेवा निर्यातीचे मूल्य ३७,३४६ डॉलरवरून वर्ष २०२२-२३ मध्ये ८०,३५० डॉलर इतके होते. त्याखालोखाल प्रवास उद्योगाचे निर्यात मूल्य या काळात २८,३५५ दशलक्ष डॉलरवरून २७,०४९ दशलक्ष डॉलर इतके झाले जे सीमांत घट दर्शवत आहे. त्याखालोखाल निर्यात मूल्याच्या आधारावर निर्यात केल्या गेलेल्या सेवा म्हणजे वित्तीय सेवा, वाहतूक, बांधकाम, विमा आणि पेन्शन, वैयक्तिक, सांस्कृतिक आणि मनोरंजन सेवा, उत्पादन सेवा, देखभाल आणि दुरुस्ती सेवा, सरकारी सेवा या होत. तर आयातीबाबत पाहिल्यास दिसून येते की, २०१७-१८ मध्ये भारताचे आयात मूल्य १,१७,५२८ दशलक्ष अमेरिकन डॉलर होते. जे वाढून २०२२-२३ मध्ये १,८२,०४५ दशलक्ष अमेरिकन डॉलर झाले. सर्वाधिक आयात व्यवसायिक सेवांची २०१७-१८ मध्ये ३६,६३० डॉलरवरून वर्ष २०२२-२३ मध्ये ५,९७०६ डॉलर इतकी झाली.

त्याखालोखाल प्रवास उद्योगाची आयात २०१७-१८ मध्ये १९,५१६ डॉलरवरून वर्ष २०२२-२३ मध्ये २८,४४७ डॉलरइतकी झाली. त्याखालोखाल आयात मूल्याच्या आधारावर आयात केल्या गेलेल्या सेवा म्हणजे दूरसंचार, संगणक आणि माहिती सेवा, वाहतूक, बौद्धिक संपत्तीच्या वापरासाठी शुल्क, वित्तीय सेवा, वैयक्तिक, सांस्कृतिक आणि मनोरंजन सेवा, देखभाल आणि दुरुस्ती सेवा, सरकारी वस्तू आणि सेवा, उत्पादन सेवा या होत.

वरील तक्त्यानुसार सेवा क्षेत्राच्या एकूण निर्यातीचे मूल्य हे आयातीपेक्षा नेहमीच जास्त राहिले आहे, म्हणजे भारताच्या सेवा क्षेत्राच्या व्यापारात या काळात अधिक्य दिसून येते. जागतिक मागणीतील वाढीच्या लाटेमुळे भारताच्या सेवा क्षेत्रातील निर्यातीने आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये २७ टक्के वार्षिक वृद्धी नोंदवली व ३२५ दशलक्ष डॉलरची विक्रमी निर्यात भारताने केली. भारताच्या निर्यात क्षेत्राचा सकारात्मक वाढीचा वेग आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या पहिल्या सहामाहीत कायम राहिला.

**उपक्षेत्रानुसार भारतातील सेवा व्यापार:**

सेवा क्षेत्रांचे भारताच्या आर्थिक विकासातील योगदान जागतिक व्यापार आणि भारताच्या व्यापारातील सेवांचे वाढते महत्त्व स्पष्ट करतात. २००५-२०११ आणि २०१२-२०१८ या कालखंडात भारत आणि जागतिक स्तरावर व्यावसायिक सेवाची निर्यात मंदावली, सेवा निर्यातीपेक्षा व्यापारी मालाची निर्यात वेगाने वाढली, मात्र, सेवा निर्यातीने उत्कृष्ट कामगिरी केली आहे. जागतिक व्यापार संघटनेनुसार, गेल्या दशकभरात जागतिक व्यापारी सेवा निर्यातीतील भारताचा वाटा सातत्याने वाढून २०१८ मध्ये ३.५ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. भारत २०१८ मध्ये जगातील सर्वात मोठ्या व्यावसायिक सेवा निर्यातदारांमध्ये ८ व्या क्रमांकावर होता. भारताची ही कामगिरी स्वागतार्ह आहे. खालील तक्त्यात दिल्यानुसार २००८-०९ ते २०१९-२०२० या दशकात निर्यातीतील उपक्षेत्रानुसार भारतातील सेवा व्यापार अभ्यासला आहे. ज्यात अगदी स्पष्टपणे उपक्षेत्रांचा एकूण सेवा निर्यातीतील हिस्सा, उपक्षेत्राच्या सेवा निर्यातीचे मूल्य व वृद्धी दर्शवली आहे.

भारताच्या सेवा क्षेत्रामध्ये आर्थिक कृतीं मुख्यतः दोन श्रेणींमध्ये वर्गीकृत केल्या जातात त्या म्हणजे संपर्क-केंद्रित सेवा ज्यात व्यापार, आदरातिथ्य, वाहतूक, रिअल इस्टेट, सामाजिक, समुदाय आणि वैयक्तिक सेवा यांचा समावेश आहे. तर गैर-संपर्क-केंद्रित सेवा ज्यात आर्थिक, माहिती तंत्रज्ञान, व्यावसायिक, दळणवळण, प्रसारण आणि गोदाम सेवा याबरोबरच सार्वजनिक प्रशासन आणि संरक्षण सेवा यांचाही समावेश होतो.

**तक्ता क्र. २: उपक्षेत्रानुसार भारतातील सेवा व्यापार**

| वस्तू समूह | वाटा (टक्के) | | मूल्य(अब्ज डॉलर) | | | वृद्धी (टक्के ) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २००८-०९ | २०१८-१९ | २०१७-१८ | २०१८-१९ | एप्रिल-सप्टेंबर २०१९-२० (P) | २०१७-१८ | २०१८-१९ | एप्रिल-सप्टेंबर २०१९-२० (P) |
| एकूण सेवा निर्यात | -- | -- | १९५.१ | २०८. | १०४.६ | १८.८ | ६.६ | ६.४ |
| प्रवास | १० | १४ | २८.४ | २८.४ | १४.६ | २२. | ०.३ | ८.२ |
| वाहतूक | ११ | ९ | १७.४ | १९.५ | १०.५ | १०. | ११.६ | १०.८ |
| विमा | १ | १ | २.५ | २.७ | १.२ | १३.६ | ६.२ | -४.९ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| GNIE* | ०.४ | ०.३ | ०.७ | ०.६ | ०.३ | १२.९ | -८.१ | ३.५ |
| सॉफ्टवेअर सर्विसेस | ४४ | ४० | ७७.३ | ८३.५ | ४६.१ | ४. | ७.९ | १२.७ |
| व्यावसायिक सेवा | १८ | १९ | ३७.३ | ३९.१ | २२.४ | १३.४ | ४.७ | १८.६ |
| वित्तीय सेवा | ४ | २ | ५.२ | ४.९ | २.५ | १.३ | -५.९ | ४.३ |
| दळणवळण | २ | १ | २.१ | २.६ | १.३ | -११.७ | २२.१ | १८.३ |
| **एकूण सेवा आयात** | -- | -- | **११७.५** | **१२६.१** | **६४.१** | **२२.६** | **७.३** | **७.९** |
| प्रवास | १८ | १७ | १९.५ | २१.७ | १२.२ | १८.६ | ११.२ | ४.३ |
| वाहतूक | २५ | १६ | १७.६ | २०.५ | १२.१ | २४.६ | १६.६ | २२.८ |
| विमा | २ | १ | १.७ | १.८ | ०.८ | १३.७ | ५.३ | -०.७ |
| GNIE* | २ | १ | ०.८ | १.१ | ०.६ | ३२.५ | ४०.३ | ११.९ |
| सॉफ्टवेअर सर्विसेस | ५ | ५ | ५.१ | ५.८ | ४. | ४३.३ | १३.१ | ३३.७ |
| व्यावसायिक सेवा | २९ | ३२ | ३६.६ | ४०.४ | २२.९ | १३.३ | १०.३ | १९.६ |
| वित्तीय सेवा | ६ | ३ | ५.५ | ३.५ | १.१ | -५.४ | -३७. | -४०.७ |
| दळणवळण | २ | १ | १. | १.१ | ०.६ | ४.८ | १८.४ | २५.१ |
| सेवा व्यापारशेष | -- | -- | ७७.६ | ८१.९ | ४०.५ | -- | -- | -- |

**स्रोत:** आर्थिक सर्वेक्षण २०१९-२०, खंड २, पान क्र. २५८(**टीप:** GNIE*- सरकार इतरत्र समाविष्ट नाही, P-प्राथमिक)

वरील आकडेवारी दर्शवते की, एप्रिल-सप्टेंबर २०१९ च्या दरम्यान सेवा क्षेत्रातील निर्यात ६.४ टक्के वृद्धी दर्शवणारी होती. २०१७-१८ मध्ये ती १८.८ टक्के होती, जी कोविड साथीच्या काळात ६.६ टक्के असून त्यानंतर जवळजवळ कायम राहिली. प्रवास, सॉफ्टवेअर, व्यवसाय आणि वित्तीय सेवांच्या निर्यात वृद्धीचा दर २०१७-१८ मध्ये खूप जास्त होता जो २०१८-१९ मध्ये कमी झाला व पुन्हा एप्रिल-सप्टेंबर २०१९-२०(P) मध्ये वृद्धी दर्शवत आहे. तर विमा आणि इतर सेवा (बांधकामासह इ.) यांच्या निर्याती २०१७-१८ च्या काळात सकारात्मक वृद्धी दर्शवत होत्या त्यात एप्रिल-सप्टेंबर २०१९-२० मध्ये घट दिसली. तसेच २००८-०९ ते २०१८-१९ या दशकात भारतातील सेवा व्यापारात प्रवास या उपक्षेत्राचा वाटा १० टक्के वरून १४ टक्के झाला व्यावसायिक सेवाचा वाटा १ टक्केनी वाढला. तर वाहतूक, विमा, वित्तीय सेवा यात घट दिसली. सॉफ्टवेअर सेवाचा वाटा या काळात ४४ टक्केवरून ४० टक्के म्हणजे ४ टक्केने घटला. भारतातील एकूण सेवा निर्यातीचा वाटा सध्या जवळजवळ ४० टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे.

भारताची सेवा निर्यात सॉफ्टवेअर सेवांमध्ये केंद्रित असून त्यानंतरचा दुसरा सर्वात मोठा घटक व्यवसाय सेवा आहे. ज्याचा वाटा एकूण सेवा निर्यातीमध्ये १९ टक्के असून सॉफ्टवेअर सेवाचा वाटा त्याच्या दुप्पटीपेक्षा जास्त म्हणजे ४० टक्के आहे. सॉफ्टवेअर क्षेत्रातील सेवांच्या निर्यातीवर विनिमय दरातील बदल, जागतिक माहिती तंत्रज्ञान सेवामधील खर्च, कठोर अमेरिकन व्हिसा नियम, वाढता खर्च

इत्यादीचा प्रभाव पडतो. भारतात सेवा निर्यात वृद्धी एप्रिल-सप्टेंबर २०१८-२०१९ दरम्यान ७.९ टक्के होती. जी वाढून २०१९-२० मध्ये १२.७ टक्के झाली, मात्र निर्यात सेवा मूल्य कमी झाले. व्यावसायिक सेवा मूल्य दरम्यानच्या काळात वाढ व पुन्हा घट दर्शवत आहे. वाहतूक, सॉफ्टवेअर, दळणवळण आणि व्यवसाय सेवांच्या आयात वाढीमुळे आर्थिक आणि विमा सेवांच्या आयातीतील संकोचामुळे आणि प्रवासी सेवांच्या कमतरतेमुळे आयात घटली. वाढत्या व्यावसायिक सेवाची आयात देयके प्रामुख्याने व्यावसायिक व्यवस्थापन आणि सल्लागार सेवा आणि तांत्रिक आणि व्यापार संबंधित सेवामुळे या काळात वाढली होती. भारतातील एकूण निर्याती व उपक्षेत्रांचे निर्यात मूल्य पाहिल्यास दिसून येते की, वित्तीय सेवा वगळता सर्व सेवांचे निर्यात मूल्य २०१७-१८ ते २०१८-१९ मध्ये वाढले व आयात मूल्य या कालावधीत कमी राहिले.

भारतात मागील दशकातील सेवा निर्यातीचा अभ्यास दर्शवतो की, पारंपारिक सेवांचा वाटा जसे की वाहतूक आणि उत्पादक मूल्यवर्धित सेवा, सॉफ्टवेअर, वित्तीय सेवा आणि दळणवळण यामध्ये घट झाली आहे. दरम्यान, प्रवासी सेवा व व्यावसायिक सेवांचा वाटा वाढला, सॉफ्टवेअर सेवांचा वाटा ४ टक्क्यांनी घसरला आहे. एप्रिल-सप्टेंबर २०१९ दरम्यान, सेवा व्यापार अधिक्य असल्याने सॉफ्टवेअर सेवांमधील अधिशेष भारताच्या व्यापारी तुटीच्या सुमारे ४८ टक्के वित्तपुरवठा करतो व अंशतः चालू खात्यावरील तुटीची भरपाई करते. सॉफ्टवेअर सेवांव्यतिरिक्त भारत प्रवास, विमा आणि आर्थिक सेवा या क्षेत्रात काही प्रमाणात व्यापार अधिशेष मिळवतो. तथापि, शैक्षणिक आयातीमुळे म्हणजे शिक्षणासाठी परदेशात जाण्याच्या प्रवासी सेवांमध्ये भारतास सतत व्यापारी तूट दिसून येते जसे सर्व शैक्षणिक खर्च जोडून २०१८-१९ मध्ये ५ अब्ज इतका खर्च म्हणजे आयात झाली. दीर्घकालीन दृष्टीकोनातून भारताच्या द्विपक्षीय व्यापार वाटाघाटी दरम्यान सेवा निर्यात वाढवण्यावर लक्ष केंद्रित करणे हे व्यापार वाढीबरोबरच व्यापार तूट कमी करण्यासाठी चांगले आहे. मात्र, दीर्घकाळात जागतिक अनिश्चितता, संरक्षणवाद आणि कठोर स्थलांतर नियम हे भारताच्या सेवा व्यापाराला आकार देण्यासाठी महत्त्वाचे घटक असतील हे ही खरे आहे.

**भारतातील निर्यात उपक्षेत्र किंवा उद्योगाचा एकूण सेवा क्षेत्राच्या निर्यातीत वाटा (वर्ष २०२३):**

भारताची सेवा क्षेत्राची एकूण निर्यात व उपक्षेत्रातील निर्यात याचा विविध कालावधीतील अभ्यास वर तक्ता क्रमांक १ आणि २ मध्ये दर्शवली आहे, काही अपवाद वगळता जी सातत्याने वाढती राहिली असे दिसते. खालील तक्ता क्र. ३ मध्ये भारतातील उपक्षेत्राची निर्यातीतील टक्केवारी दर्शवली आहे.

**तक्ता क्र. ३: भारतातील निर्यात उपक्षेत्र किंवा उद्योगाचा एकूण सेवा क्षेत्राच्या निर्यातीत वाटा**




**स्रोत:** IBEF

भारतातील उद्योगाचा एकूण सेवा क्षेत्राच्या निर्यातीत वर्ष २०२३ मध्ये वाटा पाहिल्यास दिसून येते की, एकूण सेवा निर्यातीपैकी सर्वाधिक म्हणजे ४९ टक्के वाटा असलेली सॉफ्टवेअर सेवा ही भारतातून निर्यात केलेली सर्वात मोठी सेवा होती. व्यवसाय सेवा, वाहतूक सेवा, प्रवास सेवा आणि वित्तीय सेवांचा वाटा अनुक्रमे २३ टक्के, ११ टक्के, ४ टक्के आणि २ टक्के होता. इलेक्ट्रॉनिक्स आणि कॉम्प्युटर सॉफ्टवेअर एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलच्या अंदाजानुसार, माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सक्षम सेवाच्या निर्यातीत १२.२ टक्केची वाढ होती. जी वित्तीय वर्ष २०१६-१७ मध्ये डॉलर ११७ अब्ज पर्यंत पोहोचली व २०२३-२०२४ मध्ये ती २०० अब्ज पर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर अँड सर्व्हिस कंपनीजनुसार, वित्तीय वर्ष २०२४ नुसार भारतातून एकूण तंत्रज्ञान निर्यातीची रक्कम डॉलर२०० अब्ज इतकी असेल असा अंदाज आहे.

**भारतातील सेवा निर्यात स्थाने(वर्ष २०२२-२३):**

भारत जगातील अनेक भागांमध्ये सेवा निर्यात करतो. यूएसए, यूके आणि जपान हे भारतीय सेवांचे सर्वात मोठे आयातदार आहेत. मोठ्या प्रमाणावर कामगारांची उपलब्धता, स्वस्त कामगार, इंग्रजी भाषा कौशल्ये यामुळे भारताच्या सेवा जगभरात लोकप्रिय आहेत. म्हणून, सॉफ्टवेअर, संगणक, आयटी, बीपीओ आणि कॉल सेंटर या काही मोठ्या सेवा आहेत ज्या अमेरिका, युरोप, आशिया आणि आखाती देशांमध्ये निर्यात केल्या जातात. खालील तक्ता क्र. ४ भारतातून विविध सेवांची मागणी करणाऱ्या देशांची निर्यातीतील टक्केवारी दर्शवत आहे:

**तक्ता क्र. ४: भारतातील सेवा निर्यात स्थाने (देश)**




**स्रोत:** IBEF

वर्ष २०२२-२३ मध्ये यूएसए, युरोप आणि यूके हे भारतातील सर्वात जास्त सॉफ्टवेअर सेवा आणि आय. टी. सेवा आयात करणारे देश आहेत जे अनुक्रमे एकूण निर्यातीपैकी ५५ टक्के, १४ टक्के आणि १७ टक्के सेवा आयात करतात. भारतातील इतर काही प्रमुख सॉफ्टवेअर सेवा कॅनडा, आशिया, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमध्ये आयात होतात. २०२२-२३ दरम्यान, यूएसए आणि कॅनडाने भारतातून

डॉलर१०३.९ अब्ज सॉफ्टवेअर सेवा आयात केल्या. याच कालावधीत युरोप आणि आशियाचा एकत्रित वाटा सुमारे ३७ टक्के (म्हणजे डॉलर६९ अब्ज) होता. तसेच, त्याच कालावधीत, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडचा एकत्रित वाटा ३ टक्के (म्हणजे डॉलर४.८ अब्ज) होता. हाँगकाँग, सिंगापूर, जर्मनी, बांग्लादेश, नेदरलँड आणि नेपाळ ही भारतातील काही प्रमुख निर्यात बाजारपेठा आहेत. वाणिज्य मंत्रालयाच्य प्रेस इंफोर्मेशन ब्युरोच्या माहितीनुसार जुलै २०२४ मध्ये नेदरलँड, यूएसए, टांझानिया, सिंगापूर व मेक्सिको ही भारताच्या सेवांसाठी पाच निर्यात स्थाने होती.

**भारत सरकारचे भारतातील सेवा निर्यात वाढवण्यासाठीच्या शासकीय योजना, उपक्रम व संस्था :**

- **सर्विस एक्सपोर्ट फ्रॉम इंडिया स्कीम (SEIS):** भारत सेवा निर्यात योजना निर्यातदारांना ड्युटी क्रेडिट स्क्रिप्स स्वरूपात प्रोत्साहन देते. ड्युटी क्रेडिट स्क्रिप्सचा वापर मूलभूत सीमा शुल्क आणि इतर कर भरण्यासाठी केला जाऊ शकतो. हे निर्यातदारांसाठी बक्षीस आहे, जेव्हा निर्यातदार परदेशात वस्तू किंवा सेवा विकतात व परदेशी चलन मिळवतात तेव्हा त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी या स्क्रिप्स दिल्या जातात. ज्याचा वापर आयात वस्तूवरील आयातशुल्क देण्यासाठी वापरले जातात. यामुळे निर्यातदरांची रोख रक्कम बाळगण्याची गरज कमी होते आणि इतर व्यावसायिक उपक्रमासाठी निधी उपलब्ध होतो. या योजनेअंतर्गत, निवडलेले सेवा निर्यातदार ड्युटी क्रेडिट स्क्रिप्सच्या रूपात कमावलेल्या निव्वळ परकीय चलनावर ३ टक्के/५ टक्के/७ टक्के प्रोत्साहन मिळण्यास पात्र आहे. सीमेबाहेरील व्यापार, परदेशात उपभोग, व्यावसायिक उपस्थिती या कारणासाठी या योजनेंतर्गत सेवा प्रदान केल्या जातात.
- **सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क योजना:** भारतातून सॉफ्टवेअर निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना सुरु करण्यात आली. या योजनेअंतर्गत सिंगल-विंडो क्लीयरन्स, १०० टक्के विदेशी इक्विटी, सीमा शुल्क भरण्यापासून सूट, न भांडवली वस्तूंच्या खरेदीवर वस्तू व सेवा कर परतावा आणि त्याबरोबरच भांडवली वस्तूंची आयात असे अनेक फायदे प्रदान केले जातात.
- **डिजिटल इंडिया इंटर्नशिप योजना:** डिजिटल इंडिया इंटर्नशिप योजना ही इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने सुरू केली. अनुभवी आणि पात्र मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना प्राथमिक पातळीवर अनुभव प्रदान करणे हा या योजनेचा उद्देश आहे. इंटर्नशिपमध्ये सायबर कायदा, डिजिटल फॉरेन्सिक्स, सेमीकंडक्टर्स आणि नॅनो-इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञान, डिजिटल साक्षरता, डिजिटल पेमेंट आणि अर्थव्यवस्था, माहिती सेवा व्यवस्थापन प्रणाली इत्यादींचा अभ्यासाचा समावेश आहे.
- **पीएचडी योजना:** या योजनेचा उद्देश भारतातील इलेक्ट्रॉनिक्स सिस्टम्स अँड डिझाईन मॅन्युफॅक्चरिंग आणि माहिती तंत्रज्ञान सक्षम सेवांमध्ये संशोधकांची संख्या वाढवणे हा आहे. या योजनेला २०१४ मध्ये रु. ४६६ कोटी आर्थिक खर्चाची मंजुरी देण्यात आली होती. योजनेच्या पहिल्या टप्प्यात २५ राज्ये आणि चार केंद्रशासित प्रदेशांमधील ९७ संस्थांना पीएचडीच्या जागा वाटप करण्यात आल्या. सध्या, योजनेच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये रु.४८१.९३ कोटीच्या अंदाजपत्रकाचा आहे. १,००० पूर्ण-वेळ पीएचडी उमेदवार, १५० अर्धवेळ पीएचडी उमेदवार, ५० "यंग फॅकल्टी रिसर्च फेलोशिप"

आणि २२५ पोस्ट-डॉक्टरल फेलोशिपचे पुरस्कारार्थी तयार करणे हे लक्ष्य आहे.

**भारत सरकारच्या भारतातील सेवा निर्यात वाढवण्यास प्रोत्साहन देणाऱ्या प्रशासकीय संस्था:**

- **सेवा निर्यात प्रोत्साहन परिषद:** भारत सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने स्थापन केलेली सेवा निर्यात प्रोत्साहन परिषद (SEPC) ही सर्वोच्च संस्था आहे जी भारताची निर्यात वाढावी म्हणून अनेक सुविधा देते. सल्लागार संस्था म्हणून ती भारत सरकारच्या धोरणांच्या निर्मितीमध्ये सक्रियपणे योगदान देते आणि सेवा उद्योग आणि सरकार यांच्यातील दुवा म्हणून कार्य करते. हे भारतीय सेवा उद्योगाच्या क्षमतांचे प्रदर्शन करण्यासाठी भारत आणि परदेशात खरेदीदार-विक्रेता संमेलने, परदेशी व्यापार मेळे/प्रदर्शन आणि परदेशातील प्रदर्शनांमध्ये भारत पॅव्हेलियन/माहिती बूथ यांसारख्या मोठ्या संख्येने प्रचारात्मक कार्यक्रमांचे आयोजन करते. परिषद सेवा निर्यातदारांना सेवांसाठी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील कल आणि संधींबद्दल अद्ययावत ठेवते आणि प्रोत्साहन देते व सदस्यांना त्यांची निर्यात वाढवण्यासाठी आणि वैविध्य आणण्यासाठी अशा संधींचा लाभ घेण्यासाठी मदत करते
- **इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय:** ही केंद्र सरकारची सर्वोच्च संस्था आहे. सरकारला ई-पायाभूत सुविधा प्रदान करणे, इलेक्ट्रॉनिक्स हार्डवेअर आणि माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान सक्षम सेवा उद्योगाला प्रोत्साहन देणे, संशोधन आणि विकास रचना लागू करणे आणि ई-कौशल्य आणि ज्ञानजाल (नेटवर्क) समर्थन प्रदान करणे हे मंत्रालयाचे उद्दिष्ट आहे. या संस्थेची कार्ये म्हणजे डिजिटल व्यवहार आणि पेमेंटला प्रोत्साहन देणे, माहिती तंत्रज्ञान शिक्षणाला प्रोत्साहन देणे, सायबर कायद्याच्या बाबी हाताळणे, विकास उपक्रम हाती घेणे इत्यादि आहेत.

**सारांश:**

१९८० च्या दशकाच्या मध्यात सेवा क्षेत्राचा विस्तार होऊ लागला, परंतु १९९० च्या दशकात जेव्हा भारताने व्यवहारतोलातील तुटीची गंभीर समस्या अनुभवली तेव्हा भारतात नवीन आर्थिक सुधारणांची मालिका सुरू झाली. या आर्थिक सुधारणामुळे भारतात सेवा क्षेत्राचा विस्तार झाला सेवा क्षेत्र हे भारताच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादनात केवळ प्रबळ क्षेत्र म्हणून योगदान देत नाही तर या क्षेत्राने लक्षणीय विदेशी गुंतवणूक देखील आकर्षित केली आहे, निर्यातीत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे आणि मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून दिला आहे. भारताची व्यावसायिक सेवा निर्यात वाढवणे, जागतिक सेवा बाजारपेठेतील हिस्सा वाढवणे आणि स्थूल देशांतर्गत उत्पादनात अनेक पटीने वाढ करणे या दिशेने सरकार महत्त्वपूर्ण प्रयत्न करत आहे. कारण भारत आता शेतीवर नाही तर सेवा क्षेत्रावर अवलंबून आहे. भारत हा जगातील सातवा सर्वात मोठा सेवा निर्यातदार देश आहे आणि जागतिक सेवा निर्यात बाजारपेठेतील त्याचा वाटा १९९३ मध्ये ०.५ टक्केवरून २०२२ मध्ये ४.३ टक्केपर्यंत वाढला आहे. जे तंत्रज्ञान क्रांतीचा महत्वपूर्ण प्रभाव आहे.

**संदर्भ:**

1. Economic Survey of India, 2019-20 and 2022-23
2. Indian Trade Portal, Department of Commerce, Ministry of Commerce and Industry, Government of India

3. Directorate General of Foreign Trade, Ministry of Commerce and Industry, Government of India https://www.dgft.gov.in/CP/?opt=seis
4. Press Release, Ministry of Commerce and Industry, 13 April 2023,
5. Press Release, Ministry of Finance, Posted on: 22 July 2024, 2:30PM by PIB Delhi
6. How India's services economy became a world leader, June 13, 2024
7. Services, IBEF accessed on 11 January 2024.
8. IBEF, India's service exports reached a new high of US$ 341.1 billion in FY24, Last updated: Oct, 2024
9. https://www.servicesepc.org/home/serviceSector for all services
10. https://www.ibef.org/exports/services-industry-india
11. https://www.ibef.org/blogs/india-s-services-exports-opportunities-and-capabilities
12. https://www.ibef.org/news/india-s-services-exports-to-surpass-goods-exports-by-fy30-says-gtri-report
13. https://www.ibef.org/news/india-global-services-export-to-reach-us-800-billion-by-2030-goldman-sachs
14. https://www.indiantradeportal.in/vs.jsp?lang=0&id=0,31,24100,29404#:~:text=Under%20SEIS%2C%20an%20incentive%20of,scrip%20credit%20for%20eligible%20exports.
15. https://www.investindia.gov.in/blogs/service-sector-india-paradigm-shift#:~:text=Indian%20services%20in%20the%20space,strengthen%20competencies%20in%20this%20area.
16. https://www.ibef.org/exports/services-industry-india